शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द तक्रारी.
लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील प्रस्तावावरील कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : वशिअ- १३१४/प्र.क्र.८५/११
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ मार्च,२०१५

संदर्भ : शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीडीआर-२०८०/सी-१६१४/३७७/११, दिनांक : १२ मार्च,१९८१

शासन परिपत्रक :

अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि विभाग प्रमुख असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द गुप्त प्राथमिक चौकशीच्या आधारे उघड चौकशी करण्याची आवश्यकता असल्यास सचिव, गृह विभाग यांनी मुख्य सचिव यांच्यामार्फत प्रस्ताव सादर करुन मा. मुख्यमंत्री यांचे आदेश घेणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग यांना तसे कळविण्यात येते. अखिल भारतीय सेवेतील अधिकारी व विभाग प्रमुख यांच्या व्यतिरिक्त गट- "अ" मधील अधिकाऱ्यांविरुध्दच्या भ्रष्टाचार विषयी तक्रारीसंदर्भात उघड चौकशीसाठी महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग किंवा विभाग प्रमुख यांनी व्यक्तिश: प्रकरण तपासून आणि उघड चौकशीस आवश्यक ते पुरावे असल्याची खात्री असल्यास सचिव, गृह विभाग यांची सहमती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे, अशाही सूचना संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये दिल्या आहेत.

वरील सूचना विचारात घेता गट-ब, गट-क व गट-ड संवर्गामधील शासकीय कर्मचाऱ्यांच्या विरूद्ध लाचलुचपत, भ्रष्टाचारविषयक प्राप्त तक्रारीसंदर्भात उघड चौकशी करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाची अथवा गृह विभागाची अथवा संबंधित विभाग प्रमुखांची पूर्वपरवानगी घेण्यासंदर्भात स्वयंस्पष्ट सूचना नसल्याने तशा सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. या विषयावर सर्वंकष विचार करून लाचलुचपत, भ्रष्टाचारविषयक शासन अथवा नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडील प्राप्त तक्रारी व त्यावरील कार्यवाहीसंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:

(१) अखिल भारतीय सेवेतील अधिकारी, विभाग प्रमुख व गट-अ मधील राज्य शासनाचे अधिकाऱ्यांविरुध्द भ्रष्टाचारविषयक प्राप्त तक्रारींसंदर्भात दिनांक १२ मार्च, १९८१ च्या परिपत्रकामधील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(२) गट-ब, गट-क आणि गट-ड संवर्गातील राज्य शासनाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसंदर्भात लाचलुचपतविषयक तक्रारी प्राप्त झाल्यास, तक्रारीमध्ये नमूद केलेल्या बाबींमध्ये तथ्य

आहे किंवा कसे ही बाब नियुक्ती / सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रथम तपासावी. तक्रारीमध्ये त्यांना तथ्य आढळल्यास लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत गुप्त चौकशी करण्यात यावी आणि उघड चौकशी करण्याइतपत आवश्यक ते पुरावे असल्याची खात्री असल्यास अशा कर्मचाऱ्याविरुध्द उघड चौकशीची कार्यवाही करण्यात यावी. उघड चौकशीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अशा प्रत्येक प्रकरणी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या सक्षम/ नियुक्ती प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेऊन पुढील कार्यवाही करावी.

(३) वरील (१) व (२) येथील प्रकरणांमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून उघड चौकशीकरिता परवानगी मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांत उघड चौकशीस मान्यता देण्याचा वा नाकारण्याचा निर्णय संबंधित नियुक्ती प्राधिकारी/ सक्षम प्राधिकारी यांनी घ्यावा. या विहित कालावधीत नियुक्ती प्राधिकाऱ्याने/ सक्षम प्राधिकाऱ्याने निर्णय न घेतल्यास संबंधित नियुक्ती /सक्षम प्राधिकारी यांनी लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रस्तावामधील नमूद अधिकारी/ कर्मचारी यांच्या तक्रारी संदर्भात उघड चौकशीची कार्यवाही करण्यास मंजूरी आहे, असे समजून लाचलूचपत प्रतिबंधक विभागास पुढील कार्यवाही करता येईल.

(४) उघड चौकशीस परवानगी देण्याबाबतची प्रकरणे विनाविलंब निकाली काढण्यासाठी अशा प्रकरणांचा नियुक्ती/ सक्षम प्राधिकाऱ्यांनी दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ.भगवान सहाय )
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४) शासनाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई.
५) महालेखापाल (ले. व अ.) महाराष्ट्र-१,मुंबई.
६) महालेखापाल (ले. व अ.),महाराष्ट्र-२,नागपूर.
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
९) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई
१०) *प्रबंधक, उच्च न्यायालय(अपील शाखा),मुंबई.
११) *प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
१२) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१३) सर्व मंत्रालयीन विभाग.
१४) महासंचालक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई.
१५) मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.
१६) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
१७) निवड नस्ती.

* पत्राने.

---